जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५१५ दिनांक - ०६/१२/२०२४**

युनिट-०४ गुन्हे शाखा,पुणे शहर

## जबरी चोरी करणा-या आरोपीस केले जेरबंद

दिनांक ०५/१२/२०२३ रोजी गुन्हे शाखा, युनिट-०४ चे पथक खडकी पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत असताना **पोलीस अंमलदार जहांगीर पठाण,व सुभाष आव्हाड** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, १५ दिवसापुर्वी मुळा रोड गोल सर्कल जवळ खडकी पुणे येथे एका महिलेच्या गळयातील मंगळसुत्र हिस्का मारुन चोरी करणारा इसम विकी उपाध्ये हा होमगार्ड ऑफिस, समोर आळंदी रोड विश्रांतवाडी पुणे येथे उभा असुन त्याने अंगामध्ये काळया रंगाचे जॅकेट व राखाडी रंगाची पॅन्ट घातलेली आहे. सदर पथकाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजय वाघमारे यांना माहीती दिली असता त्यांनी बातमीप्रमाणे खात्री करुन कारवाई करणेचे आदेश दिले.

गुन्हे शाखा, युनिट -०४ चे पथकाने बातमीच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता बातमीतील वर्णनाचा इसम हा होमगार्ड ऑफिस, समोर आळंदी रोड विश्रांतवाडी पुणे येथे उभा असल्याचे मिळुन आल्याने सदर इसमाला ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **विकी नितेश उपाध्ये वय १९ वर्षे रा. माता रमाबाई, आंबेडकरनगर आरटीओ ऑफिस जवळ फुलेनगर विश्रांतवाडी,पुणे** असे सांगितले.त्यास विश्वासात घेवुन दाखल गुन्हयाबाबत तपास केला असता त्याने सांगितले की, त्याने व त्याचा साथिदार याचे सोबत १५ दिवसापुर्वी मित्र त्यांचा साथीदार याचे मोटार सायकलवरुन मुळा रोड गोल सर्कल जवळ खडकी पुणे येथे पायी चालत जाणा-या महिलेच्या गळयातील मंगळसुत्र हिसका मारुन चोरी केले केल्याचे सांगितले. त्याबाबत खडकी पोलीस ठाणे येथे संपर्क साधुन खात्री करता सदर बाबत **खडकी पोलीस ठाणे गु. र. नं.३२६/२०२४ बी.एन.एस. कलम ३०४(२), ३(५)** प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहीती मिळाली.त्यांचेकडे चोरी केलेल्या मंगळसुत्राबाबत चौकशी करता त्याने सदरचे मंगळसुत्र हे त्याचा साथिदार यांचे जवळ असल्याचे सांगितले.नमुद आरोपीला पुढील कायदेशीर कारवाई करीता खडकी पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे, मा. सहायक पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री. राजेंद्र मुळीक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजय वाघमारे, युनिट-४ यांचे मार्गदर्शनात युनिट ४ कडील पोलीस उपनिरीक्षक, वैभव मगदुम, दिगंबर चव्हाण, सहा.पो.फौ. यास्मीन सय्यद, पोलीस अंमलदार हरिष मोरे, अजय गायकवाड, प्रविण भालचीम, विठ्ठल वाव्हळ, संजय आढारी, विशाल गाडे, विनोद महाजन, एकनाथ जोशी, नागेशसिंग कुंवर, , जहांगिर पठाण, मनोज सांगळे, वैभव रणपिसे, देविदास वाढंरे, राहुल परदेशी, सुभाष आव्हाड, भरत गुंडवाड, विशाल ईथापे, मपोशि रोहिणी पांढरकर, मयुरी नलावडे, चालक महिला सहा.पो. फौ.शितल शिंदे यांनी केली आहे.